"दुष्टांच्या दुष्कृत्यामुळे नाही तर सज्जनांच्या निष्क्रियतेमुळे समाज बिघडतो"
स्वयंसिद्धा महिला मंडळ, लातूर
SWAYAMSIDDHA MAHILA MANDAL
H.O. : Vishva sadan, Vivekanadpuram, Latur - 413512
S.H.: P 69, MIDC, Latur - 413512 (Maharashtra)
Mob. 8390906712/40, 8390906715/19/20/23/11/24
Email : smparchure24@gmail.com
hgdixit1971@gmail.com
URL : www.swayamsiddha.in
Coop. Society Regn. No. Maha/6120/Latur dated 15.02.1996 Public Trust Regn. No. F 5749(Latur) dated 02.07.1998 NITI Aayog - Darpan Regn. No. MH/2016/0101097
SSI Regn. No. MH16B0004742 dtd.01.09.2018 SBI Bank Ac : Cur.ac no.30140917716 IFSC:SBIN0006756 PAN No. : AABTS9369M

## स्वयंसिध्दा महिला मंडळ लातूरद्वारा संचलित

## कुटुंब सल्ला केंद्र, औसा ता. औसा जि. लातूर

# यशस्वी केस तपशील

ऑफिस मधील कामकाज आटोपतच आले होते – वेळ ५ ते ५.३० होती. आमच्या ओळखीच्याच एक अंगणवाडी सेविका, त्यांच्या मुलीला व चार महिन्याच्या नातवाला घेऊन ऑफिसमध्ये आल्या. त्यांच्या मुलीला सासरी त्रास आहे असे त्यांनी सांगितले.

त्यांची मुलगी सौ. अस्मिता हिने तिची व्यथा सांगण्यास सुरवात केली. सुरवातीस तर ती अगदी घाबरलेली होती. कोठून सुरवात करावी हेच तिला कळेनासे झाले होते. ती खूप रडत होती. कावरीबावरी झालेली होती. तिला समजावीले व धीर दिला. अस्मिताने सांगण्यास सुरवात केली. तिचा विवाह दि.४.६.२०१४ रोजी सर्व रितीरिवाजप्रमाणे श्री. सुहास कवडे यांच्याशी झाला.

लग्नानंतर काही दिवसातच तिचे नवे नवलाईचे दिवस सरले. त्यानंतर तिचा पती अगदी छोटया छोटया कारणावरून तिला त्रास देऊ लागला. सासू नणंद याही अस्मिताच्या नव-याला तिच्याबद्दल काहीही सांगायच्या व तो तिला मारहाण करायचा.

अस्मिताच्या माहेरची परिस्थिती जेमतेम होती. त्यामुळे ती माहेरीही काही कळवत नसे. असेच दिवस जात होते. सर्व काही ठीक होईल असे तिला वाटत होते. यातच तिला बाळाच्या आगमनाची चाहुल लागली. यामुळे घरातील वातावरणही थोडेफार चांगले झाले. तिला वाटले आता सर्व काहीं व्यवस्थित होईल, पण परत सासुचा त्रास सुरूच झाला.

अस्मिताला आधीपासून एक गोष्ट नेहमी खटकत असे. तिच्या नव-याची मामी! जिचे सतत घरात वर्चस्व असायचे, तिच्या नव-याचेही मामीकडे जाणे येणे असायचे. नंतर तिच्या लक्षात आले की सुहासचे त्याच्या मामीसोबत अनैतिक संबंध आहेत. हे कळल्यानंतर तिच्या पायाखालची जमीनच सरकली व यावरून त्या दोघा पती पत्नीमध्ये खूप वाद झाला व ते दोघे तिच्या माहेरी आले.

अस्मिताच्या पतीला अर्जंट काम आले म्हणून तो पुण्याला निघून गेला व ती माहेरी राहिली. नंतर दोन -तीन महिने त्याने तिची चौकशीही केली नाही. अशाच मानसिक त्रासात तिची डिलेव्हरी झाली व तिला मुलगा झाला.

मुलगा झाल्याची बातमी कळवताच तिचा नवरा मुलाला बघण्यासाठी आला पण नव-याशिवाय सासरची एकही व्यक्ती बाळाला पाहण्यास आले नाही. डिलेवरी झाल्यावर तीन महिन्यातच तिचा पती तिला पुण्याला घेऊन जाण्यास आला. पण बाळाची तब्येत व तिचीही तब्येत अजूनही व्यवस्थीत नव्हती. मागील सर्व विषय होतेच.

मागे झालेल्या चुका तो मान्य करायला तयार नव्हता. त्याने अस्मिताला धमकी दिली. जर तु पुण्याला आली नाहीस तर मी तुला कोर्टात नेईन. हे सर्व जेव्हा ती सांगत होती. तेव्हा ती रडत होती. भावनाशील झाली होती. तिची सर्व व्यथा ऐकून तिला समुपदेशन केले व तिच्या नव-याला नोटीस पाठविली. पहिल्याच नोटीसला तो हजर झाला. त्यांची एकत्रित बैठक घेतली. त्यांना समुपदेश करण्यात आले पण अस्मिताच्या म्हणण्याला त्यांचा नकार होता.

H.O. : Vishva sadan, Vivekanadpuram, Latur - 413512
S.H.: P 69, MIDC, Latur - 413512 (Maharashtra)
Mob. 8390906712/40, 8390906715/19/20/23/11/24
Email : smparchure24@gmail.com
hgdixit1971@gmail.com
URL : www.swayamsiddha.in

Coop. Society Regn. No. Maha/6120/Latur dated 15.02.1996 Public Trust Regn. No. F 5749(Latur) dated 02.07.1998 NITI Aayog - Darpan Regn. No. MH/2016/0101097
SSI Regn. No. MH16B0004742 dtd.01.09.2018 SBI Bank Ac : Cur.ac no.30140917716 IFSC:SBIN0006756 PAN No. : AABTS9369M

अस्मिताच्या पतीला त्याच्या आईला व मामीला सोबत घेऊन येण्यास सांगितले. पण नंतरच्या दोन बैठका झाल्या. सुहासने त्यांच्याकडून झालेल्या सर्व चुका मान्य केल्या व यानंतर त्याने मामीशी कसलाही संपर्क ठेवणार नाही असे सांगितले. कारण अस्मिताने कुटुंब सल्ला केंद्राची मदत घेतली. असे कळताच त्याची मामी घाबरून गेली व तिने त्यांच्याशी असलेले सर्व संबंध तोडले.

पण हे सर्व होऊनही अजून अस्मिताची परत नांदण्यास जाण्यास मानसिक तयारी होत नव्हती. त्या दोघांना एकमेकांशी बोलण्यास सांगितले. तिच्या नव-याने तिला व बाळाला बाजूला घेऊन राहतो व कसलाही त्रास देणार नाही, असा विश्वास दिला. आम्हीही त्या दोघांना त्यांच्या पुढील आयुष्याबद्दल व त्यांच्या मुलाच्या भविष्याबद्दल जाणीव करून दिली. या सर्व समुपदेशनाने तिच्या नव-याची मानसिकता अगदी बदलली व त्याला खूप पश्चाताप होत होता. अस्मितालाही कळून चुकले की, आता सर्व काही ठीक होईल व आता ती एकटी नाही.

या सर्व प्रयत्नानंतर दि.१५.६.२०१८ रोजी अस्मिता व तिच्या बाळाला घेऊन पती समवेत नांदावयास अगदी आनंदात हसत खेळत निघाली.

ती पतीसमवेत नांदायला गेल्यानंतर असं वाटल की, आज एक घर, एक संसार उध्वस्त होण्यापासून वाचला.

नुकतीच या प्रकर्णी फेरचौकशी केली असता ते दोघेही आपल्या मुलासह संसारांत खूप रमले आहेत. सुखी आहेत. संस्थेस अजून काय पाहिजे?